# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## सेवायोजन जाहिरात क्रमांक ०४/२०१९

***महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितच्या कार्यकक्षेत येणाऱ्या कार्यालयातील "विद्युत सहाय्यकाची" पदे सरळ सेवा भरतीद्वारे तीन वर्षाच्या निश्चित कंत्राटी कालावधी व तदनंतर "तंत्रज्ञ" या नियमीत पदावर कार्यक्षम आणि पात्र अशा इच्छुक उमेदवारांकडून विहित नमुन्यात ऑन लाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.***

१. **रिक्त पदांचा गोषवारा :**

| प्रवर्ग | अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व. | सा.व शै. मागासवर्ग | आ.दु.घ. | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदसंख्या | ३७५ | २३६ | १०९ | ८० | ११८ | ४४ | १५०७ | ८१ | ६०६ | ४६६ | १३७८ | ५००० |
| रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक / समांतर आरक्षणाचे विवरणपत्र | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | १२४ | ७८ | ३६ | २६ | ३९ | १५ | ४९७ | २७ | २०० | १५४ | ४४१ | १६३७ |
| महिला | ११३ | ७१ | ३३ | २४ | ३५ | १३ | ४५२ | २४ | १८२ | १४० | ४१३ | १५०० |
| खेळाडू | १९ | १२ | ५ | ४ | ६ | २ | ७६ | ४ | ३० | २३ | ६९ | २५० |
| माजी -सैनिक | ५६ | ३५ | १६ | १२ | १८ | ७ | २२६ | १२ | ९१ | ७० | २०७ | ७५० |
| प्रकल्पग्रस्त | १९ | १२ | ६ | ४ | ६ | २ | ७५ | ४ | ३० | २३ | ६९ | २५० |
| भूकंपग्रस्त | ७ | ५ | २ | २ | २ | १ | ३० | २ | १२ | ९ | २७ | ९९ |
| शिकाऊ उमेदवार | ३७ | २३ | ११ | ८ | १२ | ४ | १५१ | ८ | ६१ | ४७ | १३८ | ५०० |
| दिव्यांग उमेदवार | दिव्यांग प्रवर्ग - १०० | | | | | | | | | | | |
| अनाथ | | | | | | | | | | | १४ | १४ |

**टीप :** वरील परिच्छेदामध्ये नमूद संवर्गातील पदसंख्या कमी, जास्त अथवा रद्द होण्याची शक्यता आहे, आरक्षणामध्ये शासनाच्या आरक्षण धोरणानुसार बदल होण्याची शक्यता आहे. पदसंख्येत/आरक्षणात बदल झाल्यास त्याबाबतचा वेगळा खुलासा जाहिरातीद्वारे वा अन्य मार्गाने करण्यात येणार नाही.

२. **दिनांक २६/०७/२०१९ अखेर शैक्षणिक अर्हता :-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांचे १०+२ बंधामधील माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण

**आणि**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील व्यवसाय पाठयक्रम पूर्ण केलेवर राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी विजतंत्री/तारतंत्री अथवा सेंटर ऑफ एक्सलन्स (ईलेक्ट्रीकल सेक्टर) व्यवसायासाठी दिलेले राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण प्रमाणपत्र **किंवा** महाराष्ट्र राज्य व्यवसाय परीक्षा मंडळ यांनी प्रमाणित केलेले दोन वर्षाचा पदविका (वीजतंत्री/तारतंत्री) अभ्यासक्रम प्रमाणपत्र.

**टीप :** उमेदवारांनी ऑन लाईन अर्जामध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ बंधातील एस.एस.सी. परीक्षा अथवा तत्सम परिक्षेतील प्राप्त झालेल्या **एकूण सरासरी गुणांच्या आधारे ऑनलाईन अर्जामध्ये नोंद करावी. एस.एस.सी. परिक्षेतील "बेस्ट ऑफ फाईव्ह" च्या आधारे मिळालेल्या गुणांची नोंद निवडीसाठी ग्राह्य धरली जाणार नाही.**

**३. <u>दिनांक २६/०७/२०१९ अखेर वयोमर्यादा :-</u>**

३.१ उमेदवाराचे दि. २६/०७/२०१९ अखेर किमान वय १८ वर्षे पूर्ण व कमाल वय २७ वर्षे असणे आवश्यक आहे.

३.२ मागासवर्गीयांसाठी कमाल वयोमर्यादा ५ वर्षे शिथिलक्षम राहील.

३.३ दिव्यांग उमेदवारांकरीता सर्वसाधारण कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

३.४ माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ही ४५ वर्षाची राहील.

३.५ महावितरण कंपनीमधील पात्र कर्मचाऱ्यांसाठी कमाल वयोमर्यादेची अट लागू राहाणार नाही.

३.६ यशस्वीरित्या तदर्थ मंडल/तथा म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी यांच्या अधिपत्याखालील महावितरण/ महानिर्मिती/ महापारेषण कंपनीमध्ये शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या शिकाऊ उमेदवाराने पूर्ण केलेल्या प्रशिक्षण कालावधी एवढी कमाल वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.

३.७ खेळाडूंसाठी सेवाप्रवेशात नियमानुसार विहित असलेल्या वयोमर्यादेत ५ वर्षापर्यंत वयाची अट शिथिल राहील. तथापि, वयोमर्यादेत ५ वर्षांसाठी वयाची अट शिथिल करताना कोणत्याही प्रवर्गाची उमेदवारांची उच्चतम वयोमर्यादा ४३ वर्षे राहील.

३.८ परीक्षेच्या कोणत्याही टप्प्यावर, मागासवर्गीय उमेदवारासाठी विहित केलेली वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक अटी/ निकषांसंदर्भात कोणतीही सूट/सवलत घेतली असल्यास अशा उमेदवाराचा अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावर विचार करण्यात येणार नाही.

३.९ **वयोमर्यादेकरीता एस.एस.सी. प्रमाणपत्रावर दर्शविलेली / नोंदविलेली जन्मतारीख ग्राह्य धरण्यात येईल.**

**४. <u>मानधन:-</u>**

४.१ निवड झालेल्या उमेदवारांना खालीलप्रमाणे प्रतिमहा मानधन देण्यात येईल.

अ) प्रथम वर्ष - एकूण मानधन रुपये ७,५००/-
ब) द्वितीय वर्ष - एकूण मानधन रुपये ८,५००/-
क) तृतीय वर्ष - एकूण मानधन रुपये ९,५००/-

४.२ उपरोक्त मानधनातून भविष्य निर्वाह निधी, आयकर, व्यवसाय कर इत्यादी वजावट करण्यात येईल. भविष्य निर्वाह निधीच्या अनुषंगाने निवृत्ती वेतनाची रक्कम निवृत्ती वेतन योजनेमध्ये नियमानुसार जमा करण्यात येईल.

**५. <u>आवेदन शुल्क</u> :- सदर जाहिरातीच्या अनुषंगाने ऑनलाईन अर्ज भरणाऱ्या सर्व उमेदवारांना आवेदन शुल्क भरण्यापासून विशेष सूट देण्यात आलेली आहे.**

**६. <u>महत्वाच्या तारखा :-</u>**

| | |
|---|---|
| ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी | दि. १३/०७/२०१९ ते २६/०७/२०१९ |
| अर्ज नोंदविलेल्या उमेदवारांची यादी कंपनीच्या संकेत स्थळावर प्रसिध्दी | दि. ३०/०७/२०१९ |

**७. <u>पदसंख्या व आरक्षणासंदर्भात सर्वसाधारण तरतुदी :-</u>**

७.१ मागासवर्गाचे आरक्षण महाराष्ट्र राज्य (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार राहील.

७.२ वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. तसेच इ.मा.व. इत्यादी मागासवर्गासाठीच्या आरक्षणाबाबतच्या तरतुदी शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. व्हीजेएनटी-२०१४/ प्र.क्र.११८/व्हीजेएनटी-१ दिनांक ३१ जुलै, २०१४ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांनुसार राहतील.

७.३ जातीच्या दाव्याच्या पृष्टयर्थ महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियम) अधिनियम-२००० मधील तरतुदींनुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

७.४ शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र. एसटीसी-१६९६/प्र.क्र.३४/का-१० दिनांक ७ मार्च, १९९६ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी आदेश काढून विहित केलेल्या नमुन्यात अनुसूचित जमातीच्या उमेदवाराने जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

७.५ शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२००१/ प्र.क्र.१२०/मावक-५, दिनांक १ नोव्हेंबर, २००१, शासन परिपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक सीबीसी-१०/२००६/प्र.क्र.१५/मावक-५, दिनांक ३० जून २००६ आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी आदेश काढून विहित केलेल्या नमुन्यात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय तसेच विशेष मागास प्रवर्गातील उमेदवाराने जातीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

७.६ शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग, क्र. एसटीसी-१६९६/प्र.क्र.३४/का-१०, दिनांक ७ मार्च, १९९६ नुसार अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांनी तसेच, शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र. बीसीसी-१०/२००१/ प्र.क्र.१२०/मावक-५, दिनांक १ नोव्हेंबर, २००१ नुसार अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी, तसेच ज्या जातींना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम प्राधिकाऱ्यानी प्रमाणित केलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही प्रकारे निर्गमित केलेले प्रमाणपत्र वैध समजले जाणार नाही.

७.७ शासन परिपत्रक, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक सीबीसी-१०९६/प्र.क्र.४८/मावक-५, दिनांक १३ सप्टेंबर, १९९६ नुसार तालुका दंडाधिकारी यांनी दिनांक ३ जून, १९९६ पूर्वी प्रदान केलेले जाती विषयक प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

७.८ सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (एसईबीसी) उमेदवारांकरिता शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : सीबीसी-१०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दिनांक ७ डिसेंबर, २०१८ अन्वये विहित करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. तसेच, शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक: सीबीसी-१०/ २०१३/प्र.क्र.३५/मावक, दिनांक १५ जुलै, २०१४ अन्वये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासवर्गाकरिता (ईएसबीसी) देण्यात आलेली जात प्रमाणपत्र सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील (एसईबीसी) आरक्षणाकरिता ग्राह्य धरण्यात येईल.

७.९ आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांतील (ईडब्लूएस) उमेदवाराकरिता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग : राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९ अन्वये विहित करण्यात आलेले प्रमाणपत्र, कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठीचे पात्रता प्रमाणपत्र शासनाच्या आदेशाच्या दिनांकापासून किंवा या पदासाठी <u>अर्ज करण्याच्या दिनांकापासून ६ महिने यापैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापर्यंत सादर करणे आवश्यक आहे.</u>

**७.१० <u>समांतर आरक्षणाच्या तरतुदी :-</u>**

(अ) प्रस्तुत जाहिरातीध्ये नमूद संवर्गामध्ये काही समांतर आरक्षणाची पदे (महिला, खेळाडू इत्यादी) नमूद केली आहेत. तथापि, जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर विद्यमान पदसंख्येमध्ये बदल/वाढ होऊ शकते. सदर बदललेली पदसंख्या निकाल अंतिम करताना विचारात घेतली जातील. यास्तव, जाहिरातीमध्ये पदसंख्या कमी असल्यामुळे सदर पदासाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

(ब) महिला, खेळाडू, माजी सैनिक, शिकाऊ उमेदवार, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त इत्यादीकरिता असलेले समांतर आरक्षण कप्पीकृत (Compartmentalized) आहे.

(क) महिला, खेळाडू, माजी सैनिक, शिकाऊ उमेदवार, प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त तसेच अनाथ इत्यादीकरिता असलेले समांतर आरक्षण कंपनीने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रक/सुधारपत्रकानुसार राहील.

(ड) समांतर आरक्षणाबाबत शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ तसेच शासन शुध्दीपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक संकीर्ण-१११८/ प्र.क्र.३९/ १६-अ, दिनांक १९ डिसेंबर, २०१८ आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल.

**७.११ महिलांचे समांतर आरक्षण :-**

शासन निर्णय क्रमांक ८२/२००१/मसेआ/प्र.क्र.४१५/का-२ दि. २५/०५/२००१ मधील तरतुदीनुसार महिलांसाठी ३०% आरक्षण राहील. महिलांसाठी आरक्षित पदांकरिता दावा करणाऱ्या उमेदवारांनी महिला आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी अर्जामध्ये न चुकता महाराष्ट्राचे अधिवासी (Domiciled) असल्याबाबत तसेच नॉन क्रिमीलेअरमध्ये मोडत असल्याबाबत (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती वगळून) स्पष्टपणे दावा करणे आवश्यक आहे.

७.१२ शासन निर्णय क्रमांक न्यायप्र-१००९/प्र.क्र.२०२/०९/१६-अ दिनांक २७/१०/२००९ मधील तरतुदीनुसार प्रकल्पग्रस्त व्यक्ती अथवा त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तीला ५% व भूकंपग्रस्त व्यक्तींना २% समांतर आरक्षण राहील.

७.१३ तदर्थ मंडळ तथा म.रा.वि.मं. सूत्रधारी कंपनी यांच्या अधिपत्याखालील महावितरण/ महानिर्मिती/ महापारेषण कंपनीमध्ये यशस्वीरित्या शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थीकरिता १०% समांतर आरक्षण राहील. या व्यतिरिक्त ज्या उमेदवारांनी इतरत्र शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण पूर्ण केलेले आहे, अशा उमेदवारांचा या राखीव पदांकरिता विचार करण्यात येणार नाही.

**७.१४ अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंचे समांतर आरक्षण :-**

(अ) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी ५% समांतर आरक्षण राहील. शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक: राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक १ जुलै, २०१६, शासन शुध्दीपत्रक क्रमांक: राक्रीधो-२००२/ प्र.क्र.६८/ क्रीयुसे-२, दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ तसेच शासन शुध्दीपत्रक क्रमांक: राक्रीधो-२००२/ प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक ११ मार्च, २०१९, आणि तदनंतर शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार, प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तीचे आरक्षण सवलतीसंदर्भात कार्यवाही करण्यात येईल.

(ब) प्राविण्य प्राप्त खेळाडू व्यक्तींसाठी असलेल्या आरक्षणाचा दावा करणाऱ्या उमेदवारांच्या बाबतीत क्रीडा विषयक विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकाचे किंवा तत्पूर्वीचे असणे बंधनकारक आहे.

(क) **खेळाचे प्राविण्य प्रमाणपत्र योग्य दर्जाचे असल्याबाबत तसेच तो खेळाडू उमेदवार खेळाडूसाठी आरक्षित पदावरील निवडीकरीता पात्र ठरतो, याविषयीच्या पडताळणीकरीता त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र संबंधित विभागीय उप संचालक कार्यालयाकडे अर्ज सादर करण्याच्या दिनांकापूर्वीच सादर केलेले असणे बंधनकारक आहे. अन्यथा प्राविण्य प्राप्त खेळाडूसाठी आरक्षणाकरीता पात्र समजण्यास येणार नाही.**

(ड) नियुक्तीच्यावेळी खेळाडू उमेदवाराने विहित अर्हता धारण करीत असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले प्राविण्य प्रमाणपत्र तसेच त्यांचे प्राविण्य प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर केला तरच उमेदवारांचा संबंधित संवर्गातील खेळाडूसाठी आरक्षित पदावर नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

(इ) **एकापेक्षा जास्त खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे असणाऱ्या खेळाडू उमेदवाराने एकाच वेळेस सर्व खेळांची प्राविण्य प्रमाणपत्रे प्रमाणित करण्याकरीता संबंधित उप संचालक कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे.**

(ई) खेळाडू उमेदवाराकडून अर्जाद्वारे प्राप्त झालेल्या माहितीची छाननी करतेवेळी विहित नमुन्यातील प्रमाणित प्रमाणपत्र असल्याची खात्री करण्यात येईल. तसेच क्रीडा विभागाच्या संकेतस्थळावरील माहितीशी पडताळणी करण्यात येईल.

### ७.१५ दिव्यांग प्रवर्गासाठी समांतर आरक्षण :-

(अ) दिव्यांग प्रवर्गासाठी एक पाय बाधित व कर्णबधीर यांचेकरिता समांतर आरक्षण राहील. दिव्यांग प्रवर्गाच्या उमेदवाराजवळ अपंगत्वाचे प्रमाण ४०% पेक्षा कमी नसल्याचे कार्यालयीन परिपत्रक कार्मिक मंत्रालय, भाषा सरकार, नवी दिल्ली क्रमांक ३६०३५/३/२००४/ईएसटीटी(आरईएस), दि. २९/१२/२००५ प्रमाणे मेडिकल बोर्डाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. शासन निर्णय क्र. दिव्यांग/२०१८/प्र.क्र.११४/१६-अ दिनांक २९ मे, २०१९ अनुसार पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल. सदर शासन निर्णयानुसार दिव्यांग उमेदवाराकरीता ४% समांतर आरक्षणाची तरतूद आहे. दिव्यांग उमेदवारांची पात्रता कंपनीने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रक/ सुधारपत्रकानुसार राहील.

(ब) दिव्यांग व्यक्तींसाठी असलेली पदे भरावयाच्या एकूण पदसंख्येपैकी असतील.

### ७.१६ माजी सैनिकांसाठी समांतर आरक्षण :-

माजी सैनिकांसाठी १५% समांतर आरक्षण राहील. माजी सैनिक असणाऱ्यांनी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी कार्यालय यांच्याकडे नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. अशा माजी सैनिकांनीच अर्ज सादर करावेत अन्यथा त्यांचा अर्ज स्विकारला जाणार नाही. माजी सैनिक या उमेदवारांच्या वयोमर्यादेच्या व आरक्षणाच्या सवलतीच्या प्रयोजनार्थ खाली नमूद केलेल्या माजी सैनिकांच्या सुधारीत व्याख्येनुसार माजी सैनिक गणल्या जाणाऱ्या उमेदवारांचाच विचार केला जाईल.

An “Ex Servicemen” means a person, who has served in any rank (whether as combatant or as non-combatant) in the Regular Army. Navy and Air Force of the Indian Union but does not include a person who has served in the Defence Security Corps, the General Reserve Engineering Force, the Lok Sahayak Sena and the Para-Military Forces, and

(i) Who has retired from such service after earning his/ her pension; or

(ii) who has been released from such service on medical grounds attributable to military service or circumstances beyond his control and awarded medical or other disability pension; or

(iii) who has been released otherwise than on his own request from such service as a result of reduction in establishment; or

(iv) who has been released from such service after completing the specific period of engagement otherwise than at his own request or by way of dismissal or discharge on account of misconduct or inefficiency and has been given a gratuity and includes personnel of the Territorial Army of the following categories, namely :-

(v) pension holders for continuous embodies service;

(vi) persons with disability attributable to military service; and

(vii) gallantry award winners.

Provided that any person who has been released prior to 1st July, 1987:-

(a) at his own request after completing 5 years’ service in the Armed Forces of the Union; or

(b) after serving for a continuous period of six months after attestation otherwise than at his own request or by way of dismissal or discharge on account of misconduct or inefficiency and has been transferred to the reserve pending such release; shall also deemed to be an ex-servicemen for the purpose for this clause.

Explanation - *(1) The persons serving in the Armed forces of the Union who on retirement from service, would come under the category of “Ex-Servicemen”, may be permitted to apply for re-employment on year before the completion of the specified terms of engagement & avail themselves of all concession available to engagement in Armed Forces of the Union.*

*(2) The Armed forces personnel retired/ released at their own request but having earned their pension will be included in the term “Ex-Servicemen” defined for the purpose of reservation in posts in Government.*

**७.१७ अनाथ उमेदवारांसाठी समांतर आरक्षण :-**

(अ) अनाथ व्यक्तींचे आरक्षण शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग, क्रमांक: अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दिनांक २ एप्रिल, २०१८ तसेच यासंदर्भात शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या आदेशानुसार राहील. यानुसार अनाथ उमेदवारांना खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण विहित करण्यात आले आहे.

(ब) **उपरोक्त शासन निर्णय दिनांक ०२ एप्रिल, २०१८ नुसार अनाथ उमेदवारांवर ज्या मुलांच्या कागदपत्रांवर कोणत्याही जातीचा उल्लेख नाही व ज्याचे आई-वडील, काका-काकू, आजी-आजोबा व चुलत भावंडे व इतर नातेवाईक यापैकी कोणाबाबतही माहिती उपलब्ध नाही, अशा मुलांनाच अनाथ आरक्षण लागू राहील. तसेच ज्या मुलांचे आई-वडील हयात नसून त्यांचेकडे जातीचे प्रमाणपत्र नाही, अशा मुलांच्या बाबतीत त्यांनी संबंधित जिल्हा, महिला व बालविकास अधिकारी यांच्याकडे अनाथ प्रमाणपत्राकरीता अर्ज करणे आवश्यक आहे.**

७.१८ अराखीव (खुला) उमेदवारांकरिता विहित केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पूर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/ उपलब्ध नसले तरी, अर्जामध्ये त्यांच्या मूळ आरक्षित प्रवर्गासंदर्भातील माहिती अचूकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

७.१९ **रिक्त पदांचा घोषवारा हा मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या याचिका क्रमांक २११६/२०१३, २१४७/२०१३ आणि २३२५/२०१३ व मा. औद्योगिक कामगार न्यायालय याचिका क्रमांक ४८/२०१२ च्या आदेशाच्या / निर्णयाच्या अधीन राहून घोषित करण्यात येत आहे.**

७.२० मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट पिटीशन क्रमांक २०५३/२०१४, जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ तसेच यासंदर्भात अन्य प्रकरणी होणाऱ्या अंतिम व महाराष्ट्र शासनाच्या आदेशाच्या अधीन राहून पद भरतीची कार्यवाही करण्यात येईल.

७.२१ आरक्षणा संदर्भातील उपरोक्त शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर (www.maharashtra. gov. in.) उपलब्ध आहेत.

**८. अर्ज करण्याची पध्दत :**

८.१ उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यात येणार असल्याने नमुना अर्ज व माहिती www.mahadiscom.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. इच्छुक उमेदवार अर्ज कंपनीच्या संकेत स्थळावरुन डाऊनलोड करु शकतात. यासोबत दिलेल्या लिंकवर ऑन लाईन अर्ज भरण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

८.२ उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे. **यारकरिता उमेदवाराकडे नित्य वापरात असेल असा (valid) स्वत:चा ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक ऑन लाईन अर्जामध्ये नमूद करणे आवश्यक आहे.** भरती प्रक्रिये दरम्यान पत्रव्यवहार आणि इतर माहिती ऑन लाईन देण्यात येणार असल्या कारणामुळे भरती प्रक्रियेच्या संपूर्ण कालावधीमध्ये नोंदणी केलेला सदर ई-मेल आयडी व भ्रमणध्वनी क्रमांक वैध/कार्यरत राहाणे आवश्यक आहे.

८.३ ऑन लाईन अर्जामध्ये वैयक्तिक माहिती, संपर्क कक्षेत इतर माहिती, शैक्षणिक अर्हता इत्यादी संदर्भातील तपशीलाची अचूक नोंद करावी.

८.४ उमेदवाराचे छायाचित्र व स्वाक्षरी स्कॅन करुन अर्जामध्ये नमूद केलेल्या ठिकाणी अपलोड करणे बंधनकारक आहे. अर्ज सादर करताना उमेदवाराजवळ स्वत:चा फोटो (रुंदी ३.५ से.मी. X उंची ४.५ से.मी.) व स्वत:चा ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे. स्वत:चा विहित आकारातील फोटो व स्वाक्षरी स्कॅन करुन अपलोड करावी. याकरिता एका पांढऱ्या स्वच्छ कागदावर विहित आकाराचा फोटो चिकटवावा. तसेच विहित आकारामध्ये काळया शाईच्या पेनने चौकोनात स्वाक्षरी करावी. फोटोवर स्वाक्षरी करु नये अथवा फोटो साक्षांकित (Attested) करु नये. वरील सूचनांनुसार फोटो कागदावर व्यवस्थित चिकटवावा. स्टॅपल अथवा पिनिंग करु नये. फक्त फोटो स्कॅनवर ठेवून थेट स्कॅन करता येईल. फोटो व स्वाक्षरीची प्रत्येकाची संपूर्ण ईमेज स्कॅन करुन jpg फॉर्मेटमध्ये संगणकावर वेगवेगळया फाईल्समध्ये स्वतंत्रपणे जतन (save) करावी. फोटो व स्वाक्षरीची दोन्हीची मिळून संपूर्ण इमेज ५० Kb पेक्षा जास्त असल्यास स्कॅनरचे dpi resolution, no. of colors, etc. द्वारे स्कॅनिंगच्यावेळी Setting Adjust करावे. सोबत दर्शविलेल्या लिंकवर फोटो व स्वाक्षरी (सही) तसेच आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

८.५ **विहित नमुन्यातील ऑन लाईन अर्ज कंपनीच्या संकेत स्थळावर दिनांक १३/०७/२०१९ पासून उपलब्ध राहतील. सदर अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख २६/०७/२०१९ रोजी २३:५९ वाजेपर्यंतच राहील.** उमेदवारांचे ऑनलाईन भरलेले अर्जच स्विकारले जातील. अन्य कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची विशेष नोंद घ्यावी.

८.६ अर्जामध्ये नमूद केलेल्या बाबी/ विवरणेच ग्राह्य धरण्यात येतील. अर्ज सादर केल्यानंतर दिलेली माहिती/ विवरणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

८.७ जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केली असल्यास त्या प्रमाणपत्रांची साक्षांकित केलेली प्रत कंपनीने मागणी केल्यानंतर सादर करावी.

८.८ ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पुरावा जसे की शैक्षणिक अर्हता, वय तसेच जातीचा दाखला, जात वैधता प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर दाखला, अपंगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्र, खेळाची प्रमाणपत्रे, प्रकलग्रस्त व भूकंपग्रस्त दाखला इत्यादी प्रमाणपत्रांच्या स्वत: साक्षांकित केलेल्या प्रती सिस्टीम जनरेटेड अर्जासोबत मागणी केल्यानंतर देणे क्रमप्राप्त आहे. अशा सादर केलेल्या अर्जाची छाननी नेमणूक देण्यापूर्वी अथवा त्यानंतर कोणत्याही टप्प्यावर करण्यात येईल.

८.९ अर्जामध्ये केलेला दावा व सादर केलेल्या कागदपत्रांतील दावा यामध्ये फरक आढळून आल्यास अर्जामधील माहिती खोटी समजण्यात येईल. अर्जामधील माहिती संदर्भातील कागदोपत्री पुरावे सादर करु न शकल्यास उमेदवारी रद्द करण्यात येईल.

८.१० शासकीय/ निमशासकीय महामंडळ, इतर वीज कंपनीमधील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावे व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

## ९. <u>निवड पध्दती :</u>

९.१ उमेदवारांनी अर्जामध्ये दर्शविलेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या १०+२ बंधातील एस.एस.सी. परीक्षा अथवा तत्सम परिक्षेतील **<u>एकूण सरासरी गुणाच्या</u>** आधारे पदांची उपलब्ध संख्या व समांतर आरक्षण विचारात घेऊन निवडसूची तयार करण्यात येईल. एस.एस.सी. परीक्षा व इतर तत्सम परीक्षा यांची गुणवत्ता समान म्हणून ग्राह्य धरण्यात येईल.

९.२ निवडसूची बनविताना ज्या उमेदवाराचे गुण समान असतील अशा बाबतीत उमेदवाराची जन्मतारीख विचारात घेऊन ज्या उमेदवाराचे वय जास्त असेल (विहित केलेल्या वयोमर्यादेच्या अधीन राहून) अशा उमेदवाराला प्राधान्यक्रम देण्यात येईल. सदरची निवडसूची कंपनीच्या संकेत स्थळावर (www.mahadiscom.in) उमेदवारांच्या माहितीकरिता उपलब्ध करुन देण्यात येईल.

९.३ उमेदवाराने एका पेक्षा जास्त वेळेस अर्जाची नोंदणी केली असल्यास, अशा उमेदवाराच्या बाबतीत त्यांचा शेवटचा अर्ज व त्यामधील माहिती ग्राह्य धरण्यात येईल व इतर नोंदी रद्दबातल समजल्या जातील.

९.४ निवड झालेल्या उमेदवारांनी सिस्टीम जनरेटेड अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, उन्नत-प्रगट गटात मोडत नसणे, खेळामधील प्राविण्य, शारिरीक बाधित/व्यंगत्व, माजी सैनिक, अनाथ इत्यादी सिध्द करणे हे सर्वस्वी उमेदवाराची जबाबदारी राहील. यापैकी कोणतीही बाब उमेदवार सिध्द करु न शकल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल.

९.५ दस्तऐवज सादर करण्याच्या कालावधीमध्ये उमेदवाराने दस्तऐवज सादर न केल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

## १०. <u>इतर अटी :-</u>

१०.१ जाहिरातीत दर्शविण्यात आलेली अर्हता ही 'किमान' अर्हता आहे आणि केवळ ही किमान अर्हता हाच निकष मानून उमेदवार संबंधित पदाच्या निवडीसाठी पात्र ठरु शकरणार नाही.

१०.२ **उमेदवार हा महाराष्ट्रातील अधिवासी (Domicile) असणे आवश्यक आहे. तसेच उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान पूर्णपणे अवगत असणे आवश्यक आहे, याची उमेदवाराने नोंद घ्यावी. मराठी भाषेचे ज्ञान असलेबाबतचा पुरावा म्हणून उमेदवाराने खालील प्रमाणपत्रे / कागदपत्रे तपासणीवेळी सादर करणे आवश्यक आहे.**

**"माध्यमिक / शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा मॅट्रिक किंवा विद्यापिठीय उच्च परीक्षा संबंधित मराठी भाषा घेऊन उत्तीर्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा उमेदवार उत्तम रितीने मराठी भाषा वाचू, लिहू आणि बोलू शकतो अशा आशयाचे संविधिक विद्यापिठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातील किंवा पदव्युत्तर संस्थेतील भाषा शिक्षकाने दिलेले आणि महाविद्यालयाच्या किंवा संस्थेच्या प्राचार्यांनी प्रतिस्वाक्षरी केलेले प्रमाणपत्र."**

१०.३ निवड झालेल्या उमेदवारांना कंपनीच्या सेवेत ३ वर्षाचा कालावधी समाधानकारकपणे पूर्ण केल्यानंतर "तंत्रज्ञ" या पदावर अनुशेष आणि रिक्त पदे यांच्या अनुषंगाने सामावून घेतले जाईल. "तंत्रज्ञ" पदावर रुजू झाल्यानंतर ते मूळ वेतना व्यतिरिक्त महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व इतर भत्ते इत्यादी कंपनीच्या नियमांप्रमाणे मिळण्यास पात्र ठरतील.

१०.४ भरती प्रक्रिये दरम्यान जर एखाद्या उमेदवाराने सादर केलेली माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यात अपात्र ठरविण्यात येईल.

१०.५ जाहिरातीतील पदांची भरती प्रक्रियेबाबतचा कंपनीचा निर्णय अंतिम असून त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार वैयक्तिक पातळीवर कोणाशीही केला जाणार नाही.

१०.६ भरती प्रक्रियेत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रचार/हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्याचे निदर्शनास आल्यास अशा उमेदवाराचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

१०.७ मागासवर्गीयांनी खुल्या प्रवर्गाअंतर्गत अर्ज केला असल्यास तो नमूद केलेला विकल्प बदलता येणार नाही. संबंधित मागासवर्गीयांस सर्व बाबी खुल्या प्रवर्गाचा उमेदवार म्हणून समजण्यात येईल.

१०.८ निवड झालेल्या उमेदवारास रिक्त पद आणि अनुशेष याच्या अनुषंगाने परिमंडल कार्यालयाकडे सविस्तर पदस्थापनेकरिता वर्ग करण्यात येतील. अशा उमेदवारांना परिमंडलाच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही कार्यालयाच्या ठिकाणी रिक्त पदाच्या उपलब्धतेनुसार नियुक्त करण्यात येईल, याबाबत कंपनीचा निर्णय अंतिम राहील.

१०.९ निवड झालेल्या उमेदवाराने नियुक्तीच्या ठिकाणी स्वखर्चाने जाऊन रुजू होणे आवश्यक राहील.

१०.१० जाहिरातीत बदल किंवा जाहिरातीच्या काही भागात अंशत: बदल किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखून ठेवीत आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

१०.११ निवडीच्या कोणत्याही टप्प्याला उमेदवार विहित अर्हता धारण करीत नसल्याचे किंवा त्याचे पूर्वीचे चरित्र गैरवर्तणुकीचे आढळल्यास त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. तसेच अशा उमेदवाराची नियुक्ती झाल्यास त्यांची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

१०.१२ महाराष्ट्र सिव्हील (Declaration of Small Family) अधिनियम, २००५ अंतर्गत विहित केलेल्या छोटे कुटुंब व्याख्यांमध्ये मोडणे ही एक आवश्यक पात्रता आहे.

१०.१३ निवड सूचीची विधी ग्राह्यता (Validity) निवड यादी/प्रतिक्षा यादी प्रसिध्द झालेच्या तारखेपासून एक वर्षाची राहील. त्यानंतर निवडसूची एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर व्यपगत होईल.

*********